# प्रेस नोट

## लक्कडकोट आरटीओ चेक पोस्ट, जि. चंद्रपूर येथील मोटार वाहन निरीक्षक, यांचेविरुध्द अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, नागपूर पथकाने केली ट्रॅप कारवाई

अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो नागपूर कार्यालयात तक्रारदार यांनी तक्रार नोंद केली की, तक्रारदार हे ट्रकचालक असून त्याच्या ताब्यातील मालवाहू वाहन आरटीओ चेक पोस्ट लक्कडकोट, चंद्रपूर येथून पार करताना आरटीओ चेक पोस्ट वरील आरटीओ अधिकारी यांनी ठेवलेले खाजगी एजंट यांचे मार्फतीने कागदपत्रे तपासणीच्या नावावर एन्ट्री म्हणून यापूर्वी पैशाची मागणी केली असून दिनांक २३/०३/२०२६ रोजी तक्रारदार यांचा मालवाहू ट्रक असिफाबाद येथून नागपूर करिता जातांना लक्कडकोट येथील आरटीओ चेक पोस्टवर एन्ट्री म्हणून लाचेची मागणी करणार आहे अशी तक्रार अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो नागपूर कार्यालयात दिली.

प्राप्त तक्रारीचे अनुषंगाने आज दिनांक २३/०३/२०२६ रोजी अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, नागपूर चे पथकाने लाचेची पडताळणी करून यशस्वी सापळा कारवाई केली. लाचेची पडताळणी कारवाई दरम्यान खाजगी एजंट श्री विलास देशमुख यांनी पंचासमक्ष रू. ५००/- लाचेची मागणी करून स्वत: स्विकारली त्याकरिता श्री पवन प्रभाकरराव पोटदुखे, मोटार वाहन निरीक्षक, आरटीओ कार्यालय चंद्रपूर यांनी खाजगी एजंट श्री विलास देशमुख यास लाच मागणी करून पैसे स्विकारण्यास प्रोत्साहन दिले. दरम्यान सापळा पथक लक्कडकोट चेक पोस्टवर असल्याचा संशय आल्याने दोन्ही आरोपी घटनास्थळावरून पसार झाले. घटनास्थळावरील कार्यालयीन खोलीमधील झडतीमध्ये नगदी रक्कम ७,१२०/- रू. व सापळा रक्कम ५००/- रू. लाच रक्कम जप्त करण्यात आली. नमुद दोन्ही आरोपी विरुध्द पोस्टे राजुरा जि. चंद्रपूर येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ (सुधारणा २०१८) अन्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू असून दोन्ही आरोपींचा शोध घेणे सुरू आहे.

सदरची सापळा कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर चे पोलीस अधीक्षक डॉ. श्री. दिगंबर प्रधान, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती माधुरी बाविस्कर आणि श्री. विजय माहुलकर यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस उपअधीक्षक श्री अनिल जिट्टवार सोबत सापळा पथकातील पोलीस निरीक्षक श्री जितेंन्द्र वैरागडे, पोहवा विलीन तांबडे, पोशि होमेश्वर वाईलकर, प्रफुल्ल भातुलकर, मपोशि स्वाती हिंडोरिया सर्व नेमणुक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर यांनी केलेली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे जनतेला आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कामासाठी कोणाही लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्यांच्या विरुद्ध निर्भयपणे पुढे येऊन तक्रार नोंदवावी.

**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग येथे खालील क्रमांकावर संपर्क साधावा**

१. पोलीस अधीक्षक कार्यालय दुरध्वणी क्र. ०७१२-२५६१५२०,
२. टोल फ्री क्रमांक : १०६४ / व्हॉटसअ‍ॅप क्र. ९०६७६७१०६४
३. डॉ. दिगंबर प्रधान, पोलीस अधीक्षक, लाप्रवि नागपूर मो. क्र. ९९२३१८५५६६
४. श्रीमती माधुरी बाविस्कर, अपर पोलीस अधीक्षक, लाप्रवि नागपूर मो. क्र. ७०३८४३६४४१
५. श्री. विजय माहुलकर, अपर पोलीस अधीक्षक, लाप्रवि नागपूर मो. क्र. ९९२३१४२५६९
६. श्री. राजीव कर्मलवार, पोलीस निरीक्षक, वाचक लाप्रवि नागपूर मो. क्र. ९०२१४५२७६०